# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत विहीरी पुर्ण करण्याबाबत**

**(१) ९२६६ (०९-०४-२०१५). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन गरीब शेतक-यांना विहीर बांधण्याकरीता जवाहर रोजगार योजना राबवित असते व या उपयोगी योजनेच्या माध्यमातून विहिर बांधण्यासाठी जादा निधी शासनाने बंद केले, त्यामुळे शेतकरी विहिरीच्या सिंचनापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांच्या हितार्थ शासनाने म.गा.रे.गा योजनेंतर्गत विहीर देण्याची योजना कार्यान्वीत केली असून सदर कामावर ६०:४० च्या प्रमाणामुळे व त्यात तांत्रिक अडचणी येत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म.गा.रे.गा योजनेमध्ये चालू वित्तीय वर्षात किती विहीरी तयार केल्या आहेत व विहीरींची उद्दीष्ट पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०८-०९-२०१८) :** (१) राज्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत जवाहर विहीर योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत सन २००७-०८ नंतर नव्याने लक्षांक देण्यात आलेला नाही. तथापि सन २००७-०८ च्या लक्षांकातील अपूर्ण असलेल्या विहिरी पूर्ण करण्यात येत आहेत. जवाहर विहिरींसाठी देय असलेल्या रु.१ लक्ष अनुदानात वाढ करण्यात आली असून सदर अनुदान रु. २.५० लक्षपर्यंत वाढविण्यात आले आहे.

(२) महात्मा गांधी नरेगा अंतर्गत सिंचन विहिरीच लाभ देण्याची योजना घेण्यात येत असून त्याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर लाभ होत आहे. तथापि ग्रामपंचायत स्तरावर मजूर साहित्याचे ६०:४० प्रमाणामुळे तांत्रिक अडचणी येत असल्याने सिंचन विहिरीच्या कामासाठी या प्रमाणात दि.३०-६-२०१५ पर्यंत सुट देण्यात आली होती.

(३) महात्मा गांधी नरेगा अंतर्गत चालू वित्तिय वर्षात उपलब्ध आकडेवारीनुसार आतापर्यंत१९८८१ विहिरी पुर्ण झाल्या आहेत.विहिरींचे उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) महात्मा गांधी नरेगा अंतर्गत सिंचन विहिरींची कामे पुर्ण करण्यासाठी शासन निर्णय दि.७/३/२०१५ अन्वये अतिरिक्त सूचना देण्यात आल्या आहेत. सिंचन विहिरींच्या कामांसाठी साहित्यावरील खर्च करणेबाबत दि. २६/५/२०१५ च्या आदेशान्वये जिल्हयांना उद्दिष्ट देण्यात आले आहे

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यातील अनेक वैयक्तीक विहिरींची कामे जिल्हाधिकारी बीड यांनी बंद केल्याबाबत**

**(२) ११०१७ (०६-०४-२०१५). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यातील अनेक वैयक्तीक विहिरींची कामे जिल्हाधिकारी बीड यांनी बंद केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुर्ण विहीर किती आहेत,

(३) असल्यास, वैयक्तीक विहिरीची कामे केव्हा सुरु होतील व त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल ?

**श्री. जयकुमार रावल (०८-०९-२०१८) :** (१) नाही.

(२) आष्टी तालुक्यामध्ये ५०२, पाटोदा तालुक्यामध्ये ८४७ व शिरुर तालुक्यामध्ये ११३२ विहिरी अपूर्ण आहेत.

(३) शासन परिपत्रक दिनांक ३१ मार्च, २०१८ अन्वये मग्रारोहयो अंतर्गत घेण्यात येणाऱ्या सिंचन विहिरीची कामे पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

---

**राज्यात जिल्हा परिषद आस्थापनेवरील केंद्र प्रमुखांची १ हजार ४८ तर विस्तार अधिकाऱ्यांची ५०१ पदे रिक्त असल्याबाबत**

**(३) ३१५३६ (२२-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषद आस्थापनेवरील केंद्र प्रमुखांची १ हजार ४८ तर विस्तार अधिकाऱ्यांची ५०१ पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०९-२०१८)** :(१) क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार माहे-सप्टेंबर, २०१५ अखेर केंद्र प्रमुख व विस्तार अधिकारी यांच्या रिक्त पदांबाबतचे विवरण पत्र खालीलप्रमाणे आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| केंद्र प्रमुख | ६००३ | ४१४९ | १८५४ |
| विस्तार अधिकारी (श्रेणी-२ व श्रेणी-३) | २१४९ | १५७० | ५७९ |

(२) व (३) माहे डिसेंबर, २०१५ मध्ये जिल्हा परिषदांमधील सरळसेवेच्या कोट्यातील गट-क संवर्गातील रिक्त पदे पदभरती करुन भरण्यात आलेली आहेत.

वित्त विभागाने दिनांक २ जून, २०१५ च्या शासन निर्णयानुसार सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा एकूण संवर्गाच्या ४ टक्के यापैकी जे कमी असेल ते इतकीच पदे भरण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असलेली सर्व पदे भरण्यात निर्बंध आल्यामुळे सर्व रिक्त पदे भरता आलेली नाहीत.

---

## रोजगार हमी योजनेच्या माध्यमातुन आत्महत्याग्रस्त सहा जिल्हयात १५३४ विहीरी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४) ३६७९४ (२४-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती तालुक्यासह सहा जिल्हयातील विहिरी अपूर्णावस्थेत असल्याची बाब रोजगार हमी याजनेचे प्रधान सचिव यांना देण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेच्या कृती अहवालात नमुद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धडक सिंचन विहिरी तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०८-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि धडक सिंचन विहिरी पूर्ण कण्याच्या दृष्टीने लाभार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत. तसेच, वेळोवेळी आढवा बैठकी घेण्यात आल्या आहेत. दि.२५ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये दि.३० जून, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत अमरावती विभागातील धडक व धडकमधून वर्ग केलेल्या अशा एकूण ४०,२७२ विहिरी पूर्ण करण्यात आलेल्या असून ३,०६७ विहिरी प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेती रस्त्यांचा १०९ कोटींचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(५) ३७७८५ (२०-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेती रस्त्यांचा १०९ कोटींचा प्रस्ताव गेल्या पाच वर्षापासून केंद्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावासंदर्भात शासनाने आतापर्यत कशा पद्धतीने पाठपुरावा केला आहे,

(३) असल्यास, या प्रस्तावाची सद्यस्थिती काय व प्रलंबित प्रस्ताव पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून शेती रस्त्यांचा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर करण्यात आलेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यात कोकण विकास कार्यक्रमातर्गत विकास कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(६) ४५२८८ (२७-०४-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात कोकण विकास कार्यक्रमातर्गत साकव दुरुस्ती, डोंगरी विकास कार्सक्रमातंर्गत, जिल्हा वार्षिक योजना (रस्ते दुरुस्ती), १३ व्या वित्त आयोग,(मार्ग व पुल), कार्यालय इमारत परिरक्षण दुरुस्ती, नाविण्यपूर्ण योजना, तसेच क वर्ग पर्यटन स्थळांचा विकास कार्यक्रमातंर्गत, उर्वरित वैधानिक विकास मंडळाकडील योजना, कार्यालय इमारत परिरक्षण दुरुस्ती कार्यक्रमातंर्गत विकास कामे मोठया प्रमाणात प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील विकास कामांना निधी उपलब्ध होण्याबाबत सातत्याने शासनाकडे मागणी होत असतानाही सन २००९-२०१५ च्या योजना निहाय प्राप्त अनुदानापैकी २ कोटी ६ लाखाचा निधी अखर्चित दाखवून जिल्हा परिषदेने शासनाकडे सदर रक्कम परत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयात मोठया प्रमाणात विकास कामे करावयाची शिल्लक असतानाही जिल्हापरिषदेकडून प्राप्त निधी परत जाण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार शासनाकडे परत गेलेली रक्कम परत जिल्हयातील विकास कामांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय अाहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) शासनास परत करण्यात आलेल्या निधीची कारणे पुढीलप्रमाणे : (i) कामे पूर्ण झालेल्या कामांवरील बचत, (ii) जागेच्या अडचणीमुळे कामे झाली नाहीत त्या कामाचा निधी, (iii) अन्य योजनेतूतन काम पूर्ण झाल्यामुळे राहिलेली रक्कम, (iv) मक्तेदाराने विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याने राहिलेली रक्कम व (v) 'क' वर्ग पर्यटन मधील समुद्र किनाऱ्यालगत असलेल्या कामांना मेरीटाईम बोर्डाकडून नियोजन असलेल्या कामांना मेरीटाईम बोर्डाकडून नियोजन विभागास ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने कामे झालेली नाहीत. त्यामुळे त्या कामांना शिल्लक निधी, सदर निधी दोन वर्षापेक्षा जादा कालावधीचा असल्याने शासन निर्णय क्र.संकीर्ण १००२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक ६.६.२००८ अन्वये परत करण्यात आलेला आहे.

(५) शासन निर्णय, क्र.संकीर्ण १००२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक ६.६.२००८ अन्वये कोकण विकास कार्यक्रमांतर्गत सन २००९-१२ या वर्षातील रु.२,५९,८५६/- अखर्चित निधी शासनास जमा केला. त्यापैकी रु.१,२१,०००/- इतका निधी उपलब्ध करण्याबाबत जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी यांच्याकडे मागणी केली. त्यानंतर शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.१५ अर्थोपाय, दिनांक २५.८.२०१५ अन्वये अखर्चित रक्कम खर्च करण्याच्या कार्यप्रणाली नुसार शासनाची मंजूरी घेऊन कार्यवाही करण्यात आली.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खामगाव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे धडक सिंचन योजनेतून मंजूरी दिलेल्या विहिरींची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(७) ५४४७४ (२४-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे धडक सिंचन योजनेतून नरेगामध्ये वर्ग केलेल्या तथा शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाना प्राधान्याने लाभ देण्याच्या दृष्टीने तांत्रिक मंजूरी दिलेल्या ६८४ पैकी ५६१ विहिरींची कामे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार या विहिरींची कामे तातडीने पूर्ण करण्यासह विहीरींची कामे प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (११-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यात धडक सिंचन विहिर योजनेतून नरेगामध्ये वर्ग ११७ विहिरी व शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या वारसांना नरेगा अंतर्गत १११ विहिरी अशा एकूण २२८ विहिरींना प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ९६ विहिरींची कामे पूर्ण झाली असून ६३ विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, ५ विहिरी रद्द करण्यात आल्या असून उर्वरित विहिरी सुरू करुन विहित मुदतीत पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील मनरेगा अधिनियमांचे उल्लंघन करुन अनियमितता व गैरव्यवहार केल्याबाबत**

**(८) ५९३६४ (२४-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील मनरेगा अधिनियमांचे उल्लंघन करुन अनियमितता व गैरव्यवहार केल्याप्रकरणी मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी सदर प्रकरणी विभागीय चौकशी करुन पुढील दोन महिन्याच्या आत कारवाई केली जाईल व वसुली असेल तर वसुलीही केली जाईल असे आश्वासन देऊन आज तब्बल एक वर्षाचा कालावधी उलटून अदयापी कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर जिल्हयातील मनरेगा अंतर्गत मागील दोन वर्षामध्ये केलेल्या विविध कामांमध्ये त्रुटी आढळून आल्याने त्यानुषंगाने संबंधीतांवर करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

(अ) जैत्याळ, आमशी-वाघोबावाडी, बोलोली ता.करवीर येथील कामांबाबत श्री.आवटे व इतर २ अपचारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(ब) मौजे वडकशिवाले, कंदलगांव, चुर्ये व इस्पूर्ली ता.करवीर येथील प्रकरणांत संबंधीत उप अभियंता यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

(क) मौजे साळशी ता.शाहूवाडी येथील प्रकरण्यात श्री.सुर्वे व इतर अधिकारी/कर्मचारी यांचेबाबत प्रकरण जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यास्तरावर कार्यवाही प्रलंबित आहे.

(ड) मौजे थेरगांव, ता.शाहूवाडी येथील पाणंद रस्त्याच्या कामाबाबत चौकशी समितीकडून प्राप्त अहवालानुसार सहाय्यक आयुक्त, नरेगा, नागपूर यांनी दिलेल्या सुचनांनुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द वसुलीची कार्यवाही व प्रशासकिय कारवाई प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषद कोल्हापूर यांना कळविले आहे.

---

**मागेल त्याला शेततळे या योजनेत शेतकऱ्यांना ५० हजार ऐवजी किमान १ लाख रुपये अनुदान देण्याबाबत**

**(९) ६७७०९ (२७-०१-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागामार्फत मागेल त्याला शेततळे या योजनेत शेतकऱ्यांना फक्त ५० हजार रुपये अनुदान मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेततळ्याचे काम पूर्ण करण्यासाठी सुमारे २ लाखापर्यंत खर्च येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ५० हजारा ऐवजी किमान १ लाख रुपये अनुदान मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१८) :** (१) होय, आकारमानाप्रमाणे कमाल रु. ५०,०००/- इतके अनुदान देय आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**'ग्राम संपूर्ण परिवर्तन' मिशनची अमंलबजावणी करण्याबाबत**

**(१०) ७४००० (१४-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्र्यांनी उद्योगपती रतनटाटा, महानायक अमिताभ बच्चन आणि काही नामवंत उद्योगपतींच्या उपस्थितीत कॉर्पेरट सोशल रिस्पॉन्सबिलिटी (सीएसआर) फंडातून एक हजार गावांचा विकास करण्यासाठी 'ग्राम संपूर्ण परिवर्तन' मिशनची दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास घोषणा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता राज्य मिशनची स्थापना, सरकार व खाजगी कंपन्यांच्या प्रतिनिधींचा सहभाग असलेली कंपनी स्थापना याबाबी माहे डिसेंबर, २०१६ अखेर झालेल्या नसून मिशनच्या अमंलबजावणीसाठी प्रत्येक जिल्हयात मिशन कौन्सिलची स्थापना करण्याबाबतचा मसुदा ग्रामविकास विभागाकडे मान्यतेसाठी पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामविकासचे मिशन प्रथम १०० गावामध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून सुरु होईल असे जाहिर करुनही त्याची सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार ग्राम संपूर्ण परिवर्तन मिशनची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन या कंपनीची दिनांक १३/१/२०१७ रोजी स्थापना झालेली आहे. तसेच जिल्हा अभियान परिषदेची स्थापना करण्याबाबत दिनांक २९/१२/२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे तर्हाळा (ता.मंगरूळपीर, जि.वाशीम) येथील ग्रामसभेने मंजूर केलेल्या लाभार्थ्यांना सिंचन विहिरी देण्यास विलंब लागत असल्याबाबत**

**(११) ७७८१७ (१५-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तर्हाळा (ता.मंगरूळपीर, जि.वाशीम) येथील ग्रामसभेने १० शेतक-यांच्या सिंचन विहिरींना मान्यता देण्याचा प्रस्ताव दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ रोजी वा त्यासुमारास मंजुर केलाअसून सदर प्रस्तावावर बराच काळ कार्यवाही न झाल्याने सिंचन विहीर लाभार्थ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजीपासून उपोषण आंदोलन करण्याचा इशारा विभागीय आयुक्त, अमरावती यांना दिनांक ९ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास दिला, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामसभेने मंजूर केलेल्या १० लाभार्थ्यांना सिंचन विहिरी देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त १० लाभार्थ्यांना सिंचन विहिरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेने दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी मंजूर केलेल्या १० लाभार्थ्यांपैकी पात्र ठरलेल्या ९ लाभार्थ्यांना सिंचन विहिरीचा लाभ दिलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील भिमटेकडीचा विकास करण्यासाठी निधी मंजुर करण्याबाबत**

**(१२) ८२८०२ (१५-०४-२०१७). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील भिमटेकडीचा विकास करण्यासाठी शासनाच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री यांच्या शिफारशीनुसार जिल्ह्याधिकारी अमरावती यांनी पर्यटन विकास योजनेंतर्गत अंतर्गत १०. ८५ कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद करणार आहे काय व या कामाची कार्यकारी यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग,अमरावती यांच्याकडे ठेवण्यात आली आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिमटेकडीचा विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-११-२०१८) :** (१) होय.
अमरावती जिल्ह्यातील भिमटेकडीचा विकास करण्यासाठी जिल्हाधिकारी, अमरावती यांनी रुपये १०.८५ कोटीचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास सादर केला होता. तथापि, त्रुटींची पूर्तता करुन पुन: सादर केलेल्या प्रस्तावाची महामंडळाने छाननी करुन रुपये ९.९३ कोटीचा प्रस्ताव शासनास सादर केला.
(२) व (३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- बैठक २०१७/१०/प्र.क्र. ९६७/पर्यटन, दिनांक ६.२.२०१८ अन्वये सन २०१७-१८ मध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत भिमटेकडी, अमरावती येथील रुपये ३९८.३१ लक्षच्या कामांना मंजूरी देऊन रुपये ४०.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, अमरावती यांना वितरीत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट गाव योजनेबाबत**

**(१३) ८४८०५ (११-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्मार्टसिटीच्या धर्तीवर स्मार्ट गांव योजनेबाबतच्या दिनांक २१ नोव्हेंबर,२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील किती गावांचा सदर योजनेत समावेश करण्यात आला आहे,
(२) तसेच सदर स्मार्ट गांव योजनेंतर्गत गावातील विकासकामांसाठी तालुका व जिल्हा स्तरावर ग्रामपंचायतींना किती अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१८) :** (१) व (२) दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ च्या शासन निर्णयामधील तरतुदींनुसार, स्मार्टसिटीच्या धर्तीवर स्मार्ट गाव निर्माण करण्याची योजना नाही.

सदर शासन निर्णयानुसार, स्मार्ट ग्राम योजना राबविण्यात येत आहे. या योजनांतर्गत स्मार्ट ग्राम निवडीचे निकष व गुणांकन विहीत पध्दतीने तपासणी करुन करण्यात येते. जिल्हा स्मार्ट ग्राम म्हणून निवड करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना पारितोषिकाची रक्कम रु.४० लक्ष देण्यात येते. त्याचप्रमाणे, तालुका स्मार्ट ग्राम निवडलेल्या ग्रामपंचायतीला पारितोषिकाची रक्कम रु.१० लक्ष देण्यात येते.

स्मार्ट ग्राम पारितोषिकांच्या रक्कमांमधून संबंधित ग्रामपंचायतींना नाविण्यापूर्ण कामे करण्यासाठी खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे.
(३) सन २०१६-१७ मध्ये प्रथम स्तरावरील तालुका ३५१ स्मार्ट ग्राम पंचायतींची निवड करावयाची होती. मात्र, नांदेड जिल्हयातील भोकर तालुक्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीने योजनेत सहभाग नोंदवला नसल्याने भोकर तालुका स्मार्ट ग्राम निवड करण्यात आले नाही.

राज्यातील उर्वरित ३५० तालुक्यात तालुकास्तर स्मार्ट ग्रामपंचायत निवड करण्यात आली असून ४ तालुक्यात प्रत्येकी दोन ग्रामपंचायतींना समानगुण प्राप्त झाल्याने पारितोषिकांची रक्कम समान विभागून देण्यात आली आहे.

सन २०१७ मध्ये निवड झालेल्या जिल्हा स्मार्ट ग्रामपंचायतींना पारितोषिकांची रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वर्धा येथील जलयुक्त शिवार आढावा बैठकीत घोषित केल्याप्रमाणे खचलेल्या व बुजलेल्या विहिरीसाठी सर्व शेतक-यांना समान मदत मिळण्याबाबत

**(१४) ८८५३९ (१८-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा येथील जलयुक्त शिवार आढावा बैठकीत घोषित केल्याप्रमाणे खचलेल्या व बुजलेल्या विहिरीसाठी सरसकट सर्व शेतक-यांना समान मदत मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २९ जून, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासनाने क्र.मग्रारो २०१४/ प्र.क्र.२५/ मग्रारो-१, दिनांक २३ मे, २०१४ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन दिनांक २० जुलै, २०१५ चा सुधारित शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(३) व (४) दिनांक २० जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये जिल्ह्यातील ज्या क्षेत्रामध्ये अतिवृष्टी अथवा पूरपरिस्थिती निर्माण झालेली आहे, त्या क्षेत्रातील तलाठी, कृषी सहायक व तांत्रिक अधिकारी यांनी खचलेल्या व बुजलेल्या विहिरींचे संयुक्तपणे पंचनामे करावे व खचलेल्या व बुजलेल्या विहिरींचे दुरुस्तींची कामे नरेगा अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत.

---

**नागपूर जिल्हा परिषद ग्रामीण विकास विभागात प्रकल्प संचालक नेमण्याबाबत**

**(१५) ८९३७६ (११-०८-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा परिषद ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत ग्रामीण भागात उद्योगनिर्मिती, पडिक जमिनीचा विकास, इंदिरा, राजीव तसेच रमाई घरकुल योजना, बचतगट सक्षमीकरण, हरियाली सारख्या विविध योजना राबविल्या जात असून या महत्त्वाच्या विभागाला गेल्या ३ वर्षापासून प्रकल्प संचालक नसल्याने या विभागाचे काम पशुधन विकास अधिकारी पाहत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार तातडीने प्रकल्प संचालकाची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०८-२०१८) :** (१) अंशत:
(२) या विभागाच्या दि.२७.०८.२०१५ व दि.२०.०७.२०१७ च्या आदेशान्वये प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नागपूर हे पद भरण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेमार्फत अंगणवाडी व प्राथमिक शाळांकरिता खरेदी करावयाच्या वॉटर फिल्टर व वॉटर प्युरीफायर खरेदी निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(१६) ९१५८९ (२२-०८-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदे मार्फत अंगणवाडी व प्राथमिक शाळांकरिता खरेदी करावयाच्या वॉटर फिल्टर व वॉटर प्युरीफायर खरेदी निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाला असून निकृष्ट दर्जाच्या साहित्याची खरेदी करण्यात आली असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार वॉटर फिल्टर व वॉटर प्युरीफायर खरेदी निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१८) :** (१) सदरबाबत स्थानिक नागरिकांकडून मा.मंत्री (ग्रामविकास) यांचेकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिरोचा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील ग्रामपंचायतीनी निविदा न काढता कंत्राटदाराना तेंदुपत्ता संकलनाचे काम दिल्याबाबत**

**(१७) ९३३५५ (२१-०८-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरोचा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील नागरिकांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देण्या-या तेंदुपत्याचा हंगाम संपला असला तरी तेंदुपत्त्ता संकलनातील गैरकामकाजामुळे अतिरिक्त तेंदुपत्त्ता संकलनाच्या बोनसवर परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ग्रामपंचायतीनी कोणत्याही प्रकारची निविदा न काढता कंत्राटदाराना तेंदुपत्त्ता संकलनाचे काम दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असलयास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०१६-१७ या वर्षात पंचायत समिती सिरोंचा अंतर्गत एकूण ३६ ग्रामसभेनी स्वत: तेंदूपत्त्ता लिलाव करण्याचे ठरविले. त्यापैकी फक्त एकाच ग्रामपंचायतीने वर्तमान पत्रात जाहीरात न देता ग्रामसभा लावुन प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया पार पाडली.
(३) होय. सदर प्रकरणी गटविकास अधिकारी पंचायत समिती सिरोंचा यांच्यामार्फ़त चौकशी करण्यात आली. सदर चौकशीच्या आधारे ग्रामसभेस पुन्हा वृत्तपत्रात जाहीरात देवुन पारदर्शक लिलाव करण्याकरीता निर्देशित करण्यात आले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र शासन पुरस्कृत मागास क्षेत्र अनुदान निधी कार्यक्रमांतर्गत नेमण्यात आलेल्या ४८३ कंत्राटी कर्मचा-यांना शासनाच्या सेवेत समाविष्ट करणेबाबत**

**(१८) ९३३७२ (१९-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये केंद्र शासन पुरस्कृत मागास क्षेत्र अनुदान निधी कार्यक्रम २००७-०८ पासून सुरु करण्यात आला व या कार्यक्रमांतर्गत सन २००९-२०१० मध्ये १२ जिल्ह्यांमध्ये ४८३ कंत्राटी कर्मचारी नेमण्यात आले होते परंतु दिनांक ३१ जुलै,२०१६ रोजी पासून शासनाने ही योजना बंद करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना बंद झाल्यामुळे ६ ते ७ वर्ष शासकीय सेवेत काम करणा-या ४८३ कर्मचा-यांचा रोजगार संपुष्टात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार ४८३ कर्मचा-यांना शासनाच्या सेवेत समाविष्ट करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मागास क्षेत्र अनुदान निधी योजनेच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी अभियंता, लेखापाल, समाजप्रवर्तक व संगणक माहिती नोंदणीकार या स्वरूपाची पदे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करून घेण्यासाठी शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०१० अन्वये मान्यता दिली. त्यानुसार संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी जाहिरात प्रसिदध करून तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी कर्मचा-यांची नियुक्ती केली होती. मागास क्षेत्र अनुदान निधी योजनेसंदर्भात कामकाज पूर्ण झाल्याने समाजप्रवर्तक व संगणक माहिती नोंदणीकार या दोन कंत्राटी पदांची सेवा दिनांक ३० जून, २०१६ संपुष्टात आणली. तसेच अभियंता व लेखापाल या दोन कंत्राटी पदांची सेवा दिनांक ३१.०७.२०१६ रोजी संपुष्टात आणली.
सदरची पदे तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने व त्यावरील नियुक्त्या कंत्राटी पध्दतीने केलेल्या असल्याने त्यांना शासन सेवेत समाविष्ट करता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसंतराव नाईक तांडा वस्ती योजनेतंर्गत कोल्हापूर जिल्हयाला निधी देण्याबाबत**

**(१९) ९५०६५ (२९-१२-२०१७). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात अनेक तांडा वस्ती असतांना देखील वसंतराव नाईक तांडा वस्ती योजनेतंर्गत कोल्हापूर जिल्हयाला निधी दिला नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे अाहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार वसंतराव नाईक तांडा वस्ती योजनेतंर्गत कोल्हापूर जिल्हाला निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२६-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत समिती मार्फत तांडा/वस्त्यांच्या कामांचे प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले नाहीत. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यास मान्यता देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**आचरा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) गावातील मच्छिमारांसाठी बांधण्यात आलेले मछिमार्केट वापरास आणण्यासाठी खुले करण्याबाबत**

**(२०) ९६३०९ (२२-१२-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आचरा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) गावातील मच्छिमारांसाठी बांधण्यात आलेले माछिमार्केट माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान वापरात आणण्यासाठी खुले करण्यात येणार असल्याची तारीख देऊन सुद्धा अद्यापही याचे काम अपूर्णवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाचे १३ लाख ३२ हजार रुपयांची रक्कम ग्रामपंचायतकडे जमा असूनही मच्छिमार्केटचे काम अपूर्ण आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर मछिमार्केट तात्काळ वापरास खुले करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. राष्ट्रीय मत्स्यकी विकास मंडळाने मंजूर केलेल्या रु. १४७.३६ लाख अनुदानापैकी रु. १२८.९४ लाख इतके अनुदान प्राप्त झाले होते. निधी कपात झाल्यामुळे काम पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे. मच्छिमार्केट वापरास खुले करण्यासाठी ग्रामपंचायतीने स्वत:कडील वेळोवेळी जमा झालेल्या रकमेतून कामे पूर्ण केली आहेत.

(२) या कामाचे रु. १३ लाख ३२ हजार रुपये ग्रामपंचायतीकडे जमा होते. सदर रकमेतून रु. १२,६४,४५७/- झालेल्या कामाचे देयक अदा करणेत आले आहे.

(३) मच्छिमार्केट वापरास खुले करण्यास अत्यावश्यक सुविधा पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा याबाबतची काम आता पूर्ण झाली आहेत. महाराष्ट्र विधानपरिषद निवडणूक आचारसंहिता संपताच उद्घाटन करुन मार्केट वापरास खुले करण्यात येईल.

(४) निधी कपात झाल्यामुळे काम पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे.

---

**अकोला जिल्हा परिषदे अंतरात नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत केलेला गैरव्यवहार**

**(२१) ९६७७४ (२२-१२-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद अकोला अंतर्गत सन २०१५-२०१६ मध्ये नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत सी.सी.टीव्ही कॅमेरे खरेदी गैरव्यवहार प्रकरणी शासनाने विभागीय आयुक्त, नागपूर यांना चौकशी करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी विभागीय आयुक्त नागपूर यांनी चौकशी अहवाल शासनास सादर केला असून उक्त अहवाल अपूर्ण असल्याने शासनाने अद्याप अहवाल स्वीकारला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालात कोणत्या त्रुटी निदर्शनास आल्या असून सदर प्रकरणी शासनाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) विभागीय आयुक्त नागपूर यांचेकडून प्राप्त अहवाल शासन स्तरावर स्वीकारण्यात आला आहे.

(३) विभागीय आयुक्त नागपूर यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये नमूद त्रृटीच्या अनूषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत विभागीय आयुक्त अमरावती यांना दि. २६.०२.२०१८ च्या पत्रांन्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील मराठवाडा व विदर्भ सीमेवरील असलेल्या पानकन्हेरगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची झालेली दुरवस्था**

**(२२) ९६८४६ (०३-०१-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील मराठवाडा व विदर्भ सीमेवरील असलेल्या पानकन्हेरगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची दुरवस्था झाली असून येथील वर्गखोल्या जुन्या व कालबाहय झाल्या आहेत तसेच या शाळेत विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहाची सोय नसून येथील विद्यार्थ्यांना देण्यात येणारा पोषक आहारही निकृष्ट दर्जा असतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर शाळेतील विद्यार्थ्यांना सोयी सुविधा व पोषक आहर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०९-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) मौजे पन्हरेगाव जि.हिंगोली येथील जिल्हा परिषद शाळाच्या ६ वर्ग खोल्या चांगल्या असून १२ वर्ग खोल्याची दुरुस्ती प्रस्तावित आहे.तसेच ४ अतिरिक्त वर्ग खोल्या प्रस्तावित आहेत.

* विद्यार्थ्यांसाठी शाळेतील बोरवेलवरुन पिण्याच्या पाण्याची सुविधा केलेली आहे.
* मुली व मुलांकरीता स्वतंत्र वेगवेगळी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे.
* शालेय पोषण आहार चांगल्या दर्जाचा पुरविण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कराड तालुक्यातील हजारमाची (सदाशिवगड) ग्रामपंचायतीने ग्रामसभेत “सदाशिवगड” (हजारमाची) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय भूकंप संशोधन केंद्रास स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे नाव देण्याबाबतचा केलेला ठराव**

**(२३) ९७४७४ (२२-१२-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड तालुक्यातील (जि.सातारा) हजारमाची (सदाशिवगड) ग्रामपंचायतीने दिनांक २ ऑक्टोबर,२०१७ रोजीच्या बैठकीत “सदाशिवगड” (हजारमाची) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय भूकंप संशोधन केंद्रास स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे नाव देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते करुन तो पुढील कार्यवाहीसाठी संबंधितांकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठरावाच्या संदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१८) :** (१) होय.

मौजे हजारमाची (सदाशिवगड) ता. कराड येथील ग्राम पंचायतीने दि. २ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या ग्रामसभेत, ठराव क्र. ७१ अन्वये "सदाशिवगड" (हजारमाची) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय भूकंप संशोधन केंद्रास स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, माजी उपपंतप्रधान भारत सरकार" यांचे नाव भूकंप केंद्रास देणेबाबतचा ठराव केला. सदर ठराव दि.१३/११/२०१७ रोजी ग्रामसभेत कायम करण्यात आलेला आहे. याबाबतचा प्रस्ताव ग्रामपंचायत हजारमाची, ता. कराड, जि. सातारा यांनी दि. ४/१/२०१८ च्या पत्रान्वये श्री.प्रमोद कुमार, वैज्ञानिक सहाय्यक, पृथ्वी विज्ञान मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे ठरावाच्या प्रतींसह पाठविला आहे.
(२) "सदाशिवगड" (हजारमाची) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय भूकंप संशोधन केंद्रास "स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, माजी उपपंतप्रधान भारत सरकार" यांचे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव दि. ३/३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये या विभागाने मा. सचिव, पृथ्वी विज्ञान मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविला आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर ज़िल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ७४ शाळांची झालेली दुरवस्था

**(२४) ९९८२२ (०६-०१-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर ज़िल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ७४ शाळांच्या दुरुस्तीसाठीचा प्रस्ताव जिल्हा परिषद, शिक्षण विभागाकडे आला होता त्यासाठी २ कोटी ५ हजार १२२ रुपये निधी अपेक्षित होता परंतु या प्रस्तावाला जिल्हा नियोजन समिती यांच्याकडून केवळ १ कोटी ४० लाख एवढाच निधी देऊन उर्वरित निधी शासनाने शेतकरी कर्ज माफीसाठी कपात केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यतील वेगवेगळ्या तालुकयातील ७४ मोडकळीस आलेल्या शाळांचा निधी कपात करण्याची कारणे कोणती आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर ७४ शाळांना दुरुस्तीसाठी उर्वरित निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०९-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सन २०१७-१८ च्या महसूली व भांडवली लेख्यांतर्गत अनुक्रमे ३०% व २०% कपात करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी विविध प्रकारच्या कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ

देण्याची योजना जाहीर करण्यात आली असून वस्तु व सेवा विषयक कायदा GST मध्ये जकातकर, प्रवेशकर व स्थानिक स्वराज्य संस्थाकर (LBT) विलीन झाल्याने महापालीकांना भरपाई राज्य शासनास द्यावी लागणार आहे. हा खर्च प्राथम्याने करावयाचा असल्याने शासनाला अर्थसंकल्पीत केलेल्या खर्चावर नियंत्रण ठेवणे क्रमप्राप्त झाल्यामुळे निधी कपात केलेला आहे.

(३) जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीसाठी रु.३.६० कोटी वाढीव निधीची मागणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर तालुका व मंगळवेढा तालुका (जि.सोलापूर) येथील ग्रामीण भागातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये व नेटवर्कमध्ये समावेश करण्याबाबत**

**(२५) ९९९४७ (०६-०१-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर तालुका व मंगळवेढा तालुका (जि.सोलापूर) येथील ग्रामीण भागातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये व नेटवर्कमध्ये समावेश करण्याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांना पंढरपूर लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे विनंती केली आहे,हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर पत्रानुसार सोलापूर येथील ग्रामीण भागातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये व नेटवर्कमध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१८) :** (१) सदरचे पत्र आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील शाळा इमारत दुरुस्ती प्रस्तावातील क्रमांक जिल्हा परिषदेकडून बदलले जात असल्याबाबत**

**(२६) १००५४३ (०६-०१-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील शाळा इमारत दुरुस्तीसाठी पाठविलेल्या प्रस्तावातील क्रमांक जिल्हा परिषदेकडून बदलले जात असून दुस-याच शाळांचा समावेश केला जात असल्याबाबतची माहिती माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या पंचायत समितीच्या बैठकीत शिक्षण विस्तार अधिकारी यांनी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
• सर्व पंचायत समित्यांचे शाळा दुरुस्तीचे प्रस्ताव जिल्हा परिषद स्तरावर एकत्रित करुन तयार केलेल्या यादीनुसार शाळा दुरुस्तीचे प्रस्ताव मंजूर केले जातात.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील महारष्ट्र जिल्हा प्राधिकरणाकडून जिल्हा परिषद लातूर कडे हस्तांतरित ६६ कर्मचा-यांना शासनाच्या सेवा विषयक लाभ मिळत नसल्याबाबत**

**(२७) १०११६९ (२६-१२-२०१७). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील महारष्ट्र जिल्हा प्राधिकरणाकडून जिल्हा परिषद लातूर कडे हस्तांतरित ६६ कर्मचा-यांना राज्य शासनाच्या सेवा विषेयक नियमाच्या तरतुदीनुसार वेतन व भत्ते देण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर जिल्ह्यातील महारष्ट्र जिल्हा प्राधिकरणाकडून जिल्हा परिषद लातूर कडे हस्तांतरित ६६ कर्मचा-यांना मागील ४ महिन्यापासून वेतन अदा केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी प्रधान सचिव स्वच्छता विभाग, मुंबई यांच्याकडे १७ ऑक्टोबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये सदरील कर्मचा-यांचे वेतन व भत्ते अदा करणेसाठी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर विनंतीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०९-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर कर्मचा-यांच्या वेतन व भत्यांची अदाई पाणी पुरवठा निधी अंतर्गत पाणी पट्टी वसुली पासून जमा होणा-या निधीतून करण्यात येते, पाणीपट्टीची वसुली अत्यंत अल्प असल्याने या कर्मचा-यांचे वेतन वेळीच अदा होत नाही. यास्तव अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांना दि.१७/१०/२०१७ अन्वये किमान महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाकडून जे ६६ कर्मचारी जिल्हा परिषद, लातूरकडे हस्तांतरीत झालेले आहेत, त्यांच्या वेतन व भत्यांकरीता शासन स्तरावरुन २२१५-१९१४ या शासन लेखा शिर्षा अंतर्गत

निधी उपलब्ध करण्याबाबत विनंती करण्यात आलेली होती. या पत्राच्या अनुषंगाने अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी त्यांचे दि.२नोव्हेंबर,२०१७ अन्वये कळविले की, १९९८ मध्ये झालेल्या त्रिस्तरीय करारातील अटी व शर्तीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाकडून लातूर जिल्हा कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्ती वेतनाच्या खर्चाची जबाबदारी जिल्हा परिषदेची असल्यामुळे,परिणामकारक पाणीपट्टीची वसुली करुन कर्मचा-यांच्या वेतन व भत्याचा प्रश्न जिल्हा परिषद स्तरावरुन निकाली काढण्यात येईल.

पाणीपट्टी वसुलीबाबत पथके निर्माण करण्यात आलेली आहेत. त्याप्रमाणे परिणामकारक वसूली करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत आहे.

(५) ग्राम पातळीवर परिणामकारक वसूली होत नसल्याने वेळेत वेतनाची अदाई होत नाही.

---

**ग्राम पंचायत भेंडवी (पं.स.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२८) १०१६५९ (२२-१२-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्राम पंचायत भेंडवी (पं.स.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याबाबतचा अहवाल संवर्ग विकासा अधिकारी(उ.श्रे.) पंचायत समिती राजुरा यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा.) जि.प. चंद्रपूर यांना दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा.) जिल्हा परिषद,चंद्रपूर यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१८) :** (१) होय, खरे आहे.

(२) श्री. आनंदराव किसन गेडाम व इतर ग्रामस्थ, रा.भेंडवी यांनी दिनांक ०९.११.२०१५ रोजीच्या तक्रार अर्जान्वये ग्रामपंचायत भेंडवी पंचायत समिती राजुरा येथील सामान्य फंडातून व संपूर्ण स्वच्छता अभियानाअंतर्गत बांधलेल्या शौचालय तथा वृक्ष लागवड करण्यात आलेल्या खर्चात प्रचंड अफरातफर झाली असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती राजुरा यांनी दिनांक ४.०१.२०१६ रोजी चौकशी अहवाल सादर केला. यामध्ये तत्कालीन ग्रामसेवक श्री. एम.जे. नागदेवते व श्री. आर.आर. डाहूले हे दोषी आढळल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या दिनांक २९.३.२०१६ च्या आदेशान्वये त्यांना निलंबित करण्यात आले होते. निलंबनाचा कालावधी तीन महिन्यापेक्षा जास्त झाल्याने श्री. नागदेवते व श्री. डाहुले यांना दिनांक १०.१०.२०१६ च्या आदेशान्वये त्यांना पूर्ववत पदावर घेण्यात आले. तत्कालिन ग्रामसेवक श्री. नागदेवते यांच्याविरुध्द दि.१२.०४.२०१७ च्या आदेशान्वये व श्री.डाहुले यांच्याविरुध्द दिनांक ०३.०३.२०१७ च्या आदेशान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## जिल्हा परिषद बुलडाण्याचे बांधकाम विभागाचे, स्वतंत्र विभागीय कार्यालय खामगाव येथे करणेबाबत

**(२९) १०२८१६ (०६-०१-२०१८). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या विविध योजनेचा व्याप लक्षात घेता खामगाव येथे अतिरिक्त जिल्हा परिषद बांधकाम विभाग सुरु करणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ०९ डिसेंबर,२०१४ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांचा याबाबतचा प्रस्ताव पत्र क्र. ३१३८ दिनांक ७ सप्टेंबर,२०१४ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सा. बां . विभागाप्रमाणे खामगाव येथे जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे स्वतंत्र विभाग खामगाव येथे सुरु करण्यात आल्यास घाटाखालील ६ तालुक्यातील प्रलंबित काम जलद गतीने होणार असल्याने सदर प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे
(३) व (४) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २/६/२०१५ अन्वये नवीन पदे निर्मितीवर पुर्ण बंदी घालण्यात आली आहे. तथापि,जिल्हा परिषद बांधकाम विभाग निर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या विचार विनिमयासह उच्चस्तरीय समिती समोर ठेवण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील धोंडामारयाची मेठ येथे शाळेवर झाड कोसळल्याने शाळेचे झालेले नुकसान

**(३०) १०२८५९ (०६-०१-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यामधील धोंडामारयाची मेठ येथे मे महिन्यामध्ये झाड कोसळून शाळेच्या तीनपैकी दोन खोल्यांची पडझड झाली होती, त्या खोल्यांची दुरुस्ती अद्यापही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील आठ महिन्यांपासून दुरुस्ती प्रलंबित राहिल्यामुळे ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना पंचायत समिती कार्यालयात बसवण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर शाळेची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार उक्त्त शाळाचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या तीन वर्गखोल्या व २ स्वच्छतागृहे असून वादळामूळे शाळेच्या वर्ग खोल्यांवर झाड कोसळले नसून २ स्वच्छतागृहांवर कोसळले होते. सदर स्वच्छतागृहाचे ग्रामपंचायत खोच यांच्याकडून नवीन दोन स्वच्छतागृह बांधून देण्यात आलेली आहेत.

(३) सन २०१६-१७ मध्ये नियोजन समितीच्या निधीमधून सदर शाळेच्या ३ वर्ग खोल्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे. सन २०१७-१८ मध्ये शाळेच्या पटसंख्येनुसार एक अतिरिक्त वर्ग खोली मंजूर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील शेलू ते पुरी रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३१) १०३७७६ (०६-०१-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील शेलू ते पुरी रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे. पाहणीत रस्त्याच्या एकुण १६ कि.मी. लांबीपैकी १२ कि.मी. लांबीत खड्डे पडुन रस्ता खराब झाल्याचे आढळुन आले.

(३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतर्गत सन २०१७-१८ मध्ये सदर ११.७३ कि.मी. लांबीच्या रस्त्याला रु. ६६४.९१ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असुन सदरच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील चणकापूर झाडी एरंडगाव तलाव प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) १०३७८६ (०३-०१-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील चणकापूर झाडी एरंडगाव तलाव गेल्या ४५ वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे आॅगस्ट,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कालव्यांतर्गत दुष्काळी भागात दोन लघुपाटबंधारे, २३ पाझर तलाव, ११ बंधारे त्यांच्या क्षमतेच्या ५० टक्के भरण्यासाठी चणकापूर धरणातून पूर पाणी देणे नियोजित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार या कालव्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०८-२०१८) :**(१) खरे नाही,
पुनंद प्रकल्पाच्या सन १९९९ च्या प्रथम मंजूर सु.प्र.मा. प्रस्तावामध्ये या कामाचा अंतर्भाव असून एकूण ३४.५० कि.मी. पैकी ३१ कि.मी. पर्यंतची कामे सन २०१७ मध्ये पूर्ण झाली आहे.
(२) प्रकल्प अहवालानुसार चणकापूर उजवा वाढीव कालव्याद्वारे २ ल.पा.तलाव २३ पाझर तलाव व ११ को.प.बंधारे त्यांच्या ५० टक्के क्षमतेपर्यंत पूर पाण्याने भरण्याचे प्रस्तावित आहे.
(३) चणकापूर उजवा वाढीव कालव्याचे किमी १ ते ३१ पर्यंतचे काम बहुतांशी पूर्ण झाले आहे. किमी ३२ ते ३५ मधील कामाचे अंदाजपत्रकास महामंडळाने तांत्रिक मान्यता दिली आहे. तथापि, विषयांकित जमिन महामंडळाच्या ताब्यात नसल्याने सदर कामाच्या प्रारुप निविदा संचास महामंडळाने स्थगिती दिली आहे. सद्य:स्थितीत या लांबीतील कामासाठी ८.०९ हे. क्षेत्र भूसंपादनाची आवश्यकता असून सदर क्षेत्र सरळ खरेदीद्वारे संपादन करावयाच्या दृष्टीने ४.१५ हे क्षेत्रासाठी शेतकऱ्यांची संमती प्राप्त झाली असून उर्वरीत ३.९४ हे.क्षेत्राची संमती मिळविण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. आवश्यक भूसंपादनानंतर निविदा कार्यवाही पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा परिषद निविदा प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याबाबत

**(३३) १०५५०२ (२८-०३-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत २२ बंधाऱ्याच्या ई निविदा प्रक्रियेत हस्तक्षेप केल्यामुळे लघु पाटबंधारे विभाग, जि.प नाशिक यांची विभागीय चौकशी सुरु केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०८-२०१८) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) दोन कामांच्या अनियमिततेे बाबत नाशिक जिल्हा परिषदेने दि. ८/१/२०१८ रोजी संबंधित श्री. बापू विक्रम देसले, कार्यकारी अभियंता सध्याचे पदनाम जिल्हा जलसंधारण अधिकारी, जि.प. नाशिक यांचे विरुध्द खाते चौकशी प्रस्तावित करणेत आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा (जि.अमरावती) येथील अप्पर वर्धा धरणाच्या पाटसरा नादुरुस्त होऊन फुटल्यामुळे शेतक-यांच्या हरभरा पिकांचे झालेले नुकसान**

**(३४) १०६४६० (१३-०४-२०१८). अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथील अपप्पर वर्धा धरणाच्या पाटस-या काटेरी झुडुपांनी व्यापलेला असुन त्या नादुरुस्त होऊन फुटल्यामुळे तिवसा मधील शेतक-यांच्या हरभरा पिकांचे मोठया प्रमाणत नुकसान झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतक-यांना तात्काळ मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

३०.११.२०१७ च्या लोकशाही वार्ता, अमरावतीच्या वृत्तपत्रामध्ये सदर बातमी प्रसिध्द झाली. परंतु पिकांचे नुकसान झाल्याबाबत निवेदने प्राप्त झालेले नाहीत.

(२) नाही.

महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ व २००५ अन्वये पाटचारीची देखभाल व दुरुस्ती ही लाभधारकांची जबाबदारी आहे. लाभधारकांनी सामुहिकरित्या पाटचाऱ्यांची साफसफाई करण्याचे आवाहन सिंचन हंगामापूर्वी जाहीर प्रगटनाद्वारे करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपुर अंतर्गत एम.डब्लु.एस.आय.पी. च्या कामात अधिकारी व कंत्राटदाराने केलेला गैरव्यवहार**

**(३५) १०८६४५ (१३-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, नागपुर अंतर्गत लघुपाटबंधारे विभाग, नागपुर (नागपुर पाटबंधारे विभाग, (दक्षिण) नागपुर) व पेंच पाटबंधारे विभाग, नागपुर (भु व जल व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प, नागपुर) अंतर्गत सन २००८ ते २०१४ च्या आर्थिक वर्षात एम.डब्लु.एस.आय.पी वर्ल्ड बँकेच्या निधीतून सुमारे ३२५ कोटी रूपयाचे व विशेष दुरूस्ती नविनीकरण कामासाठी सुमारे ८० कोटी रूपयाची कालवे दुरूस्ती, लाईनिंगचे कामे, मुरूमाची कामे, कांक्रिटची कामे तसेच रीशेक्सनिंगची कामे मोठया प्रमाणात कंत्राटदार एजन्सी मार्फत करण्यात येणे, सदर कामामध्ये माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त माहितीच्या आधारे खोटे एम.बी. बील तयार करणे, कामे न करताच देयके घेवून गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी कंत्राटदाराविरूद्ध अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपुर यांना वारंवार अखिल भारतीय पत्रकार संघ, नागपुर व सामाजिक कार्यकर्ते यांच्या तर्फे गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत दिनांक २७ ऑक्टोबर,२०१४ व दिनांक २९ मे,२०१५ तसेच मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १९ डिसेंबर,२०१७ रोजी लोकप्रतिनिधींद्वारे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अधिक्षक अभियंता व परीमंडळ अधिकारी दक्षता पथक (नागपुर परीमंडळ) जलसंपदा विभाग, नागपुर यांना ही अखिल भारतीय पत्रकार संघ, नागपुर व सामाजिक कार्यकर्ते यांनी दिनांक ०७ व २७ जून,२०१६, दिनांक २३ नोव्हेंबर,२०१६ व दिनांक १४ डिसेंबर,२०१६ याप्रमाणे वारंवार तक्रार देवूनही प्रकरणाची चौकशी वा कार्यवाही अद्यापर्यंत न करणे, चौकशी प्रलंबित असणे त्यामुळे दिनांक १९ डिसेंबर,२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री यांना लोकप्रतिनिधींने तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०९-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) दक्षता पथक परिमंडळ, नागपूर यांचे मार्फत चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयासाठी पश्चिम वाहिन्या नद्यांचे पाणी गोदावरी खो-यात वळविण्याबाबत**

**(३६) १०८६९८ (१०-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील गोदावरी नदीवर बांधलेल्या जायकवाडी धरणातील पाण्याची तुट भरुन काढण्यासाठी शासनाने पश्चिम वाहिन्या नद्यांचे पाणी गोदावरी खो-यात वळविण्यासाठी सहा महिन्यात निर्णय घेण्याच्या सूचना मा.उच्च न्यायालयाच्या असुनही शासन अदयापही आवश्यक कार्यवाही करीत नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव जायकवाडी धरणाची तुट भरुन निघत नसल्याने मराठवाडयातील पाण्याचा तुटवडा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०९-२०१८) :** (१) नाही.

तथापि जनहीत याचिका क्र.१७३/२०१३ निर्णयाच्या अनुषंगाने पश्चिम वाहीनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे वळविणेबाबत ऑगष्ट २००१ च्या अहवालातील शिफारशी केल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी ६ महीने कालमर्यादा तसेच २३ प्रवाही वळण योजनेची कार्यवाही करणेसाठी १ वर्षाची कालमर्यादा मा.उच्च न्यायालयाने निर्णयान्वये दिलेली आहे.

(२) होय.

३) पश्चिमवाहिनी दमणगंगा, पार, वैतरणा, उल्हास खो-यातून पूर्वेकडे गोदावरी खो-यात पाणी वळविण्यासाठी २३ प्रवाही वळण योजनांची कामे विविध टप्प्यावर प्रगतीपथावर आहेत. या २३ प्रवाही वळण योजनांपेकी १२ प्रवाही वळण योजना पूर्ण झालेल्या असून ५ योजना बांधकामाधीन आहेत. ३ योजनांना शासनाची तत्वत: मान्यता आवश्यक आहे.२ योजनांना प्र.मा. आवश्यक आहे. १ योजना प्राथमिक स्तरावर (भूसंपादन) आहे.

या शिवाय पार खोऱ्यातील पाणी उपसाव्दारे गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी उपसा जोड योजना क्र.३ व ४ ता.पेठ, जि.नाशिक या योजना प्रस्तावित असुन सर्वेक्षण व अन्वेषण प्रगतीपथावर आहे.

तसेच दमणगंगा (एकदरे)-गोदावरी व दमणगंगा-वैतरणा-गोदावरी या दोन राज्यांतर्गत नदीजोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत शासनस्तरावरुन राष्ट्रीय जलविकास अभिकरणास कळविण्यात आले आहे व राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत प्रकल्प अहवाला बाबतची कार्यवाही प्रगतीत आहे. पार-गोदावरी नदी जोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे. उपरोक्त राज्याअंतर्गत नदी जोड योजना हया आंतरराज्यीय नदी जोड योजना पार-तापी-नर्मदा व दमणगंगा-पिंजाळ सोबत राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घेणे प्रस्तावित असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चांदवड (जि.नाशिक) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मौजे मंगरूळ एनएस ३ गुरूद्वारा ते जोफळपर्यंत रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३७) १०९३१८ (०९-०४-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड (जि.नाशिक) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मौजे मंगरूळ एनएस ३ गुरूद्वारा ते जोफळपर्यंत १२ कि.मी.चे रस्त्याचे काम सन २०१६-१७ पासून सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे कंत्राटदार (वालिया) यांच्या कामाबाबत स्थानिक नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी असून हे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने कंत्राटदाराना देयक अदा करू नये अशी स्थानिक नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधीत कंत्राटदारावर शासनाने काेणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०८-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील सिंचन विहिरी लाभार्थ्यांकडून**
**अधिकाऱ्यांनी घेतलेले पैसे त्यांना परत करण्याबाबत**

**(३८) १०९९६४ (०९-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील सिंचन विहिरींसाठी ६४५ लक्षांक असताना ९२४ लाभार्थ्यांना मंजुरी आदेश दिले, लक्षांकापेक्षा जास्त २७९ आदेशांची पंचायत समितीमध्ये नोंद नसल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाभार्थीना देयकासाठी वारंवार संबंधीत अधिका-यांकडे जावे लागत असून संबंधीत अधिकारी लाभार्थ्यांकडून पैसे घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिंचन विहिरी लाभार्थ्यांना त्यांचे पैसे त्वरित देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-०९-२०१८) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यासह मराठवाड्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत मिळणारी मजूरी मजुरांना वेळेवर मिळत नसल्याबाबत**

**(३९) ११००५६ (०७-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह मराठवाड्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत मिळणारी मजूरी वेळेवर मिळत नसून केवळ ४९ टक्के मजूरी वेळेवर अदा करण्यात आली असून उर्वरित ५१ टक्के मजूरांची रोहयो योजनेंतर्गत केलेल्या कामाची मजूरी अद्यापही देण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मजूरांनी काम पूर्ण केल्यानंतर १५ दिवसांच्या आत मजूरी देणे आवश्यक असतांनाही एवढ्या मोठ्या प्रमाणात मजूरी थकीत ठेवण्याची आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना त्यांची मजूरी वेळेवर न अदा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१८) :**(१) हे खरे नाही.

संपूर्ण राज्यात मजुरांना वेळेत मजूरी मिळण्याबाबतची टक्केवारी ही ६८.०१ टक्के आहे. मराठवाड्यातील बीड, परभणी व हिंगोली जिल्ह्यामध्ये हे प्रमाण कमी असून सरासरी ३१.१७ टक्के आहे.

(२) व (३) मजूरी वेळेवर अदा करण्यात न आल्याच्या कारणास्तव बीड व हिंगोली जिल्ह्यात अद्यापपर्यंत अनुक्रमे रु.१३,१८,२३३/- व रु.२,३७,३७३/- एवढी रक्कम संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्याकडून वसूल करण्यात आली आहे. परभणी जिल्ह्यामध्ये १७४ अधिकारी / कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात आले असून एकूण रु.४,२९,९०८/- इतका दंड आकारण्यात आला आहे. औरंगाबाद विभाग वगळता, उर्वरित राज्यात मजुरांना वेळेत मजूरी मिळण्याबाबतची टक्केवारी ही सरासरी ७०.५९ टक्के आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळापुर (जि.अकोला) तालुक्याचा विहीर ६४५ लक्षांक असतांना ९२४ लाभार्थ्यांचे मंजुरीचे आदेश काढल्याबाबत**

**(४०) ११०३०९ (११-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या दिनांक १४ डिसेंबर २०१७ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत बाळापुर (जि.अकोला) तालुक्याचा विहीर ६४५ लक्षांक असतांना ९२४ लाभार्थ्यांचे मंजुरी आदेश काढण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ९२४ मंजुरी आदेशापैकी २७९ मंजुरी आदेशाची पंचायत समिती बाळापुर येथील कार्यालयात कुठेच नोंद नसल्याचे दिसून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,एका लाभार्थ्याला २ लाख १६ हजार रुपये प्रदान केल्यावर त्याची विहीर लक्षांकाबाहेर असल्याचे निदर्शनास आल्यावर सदर लाभार्थ्याचा दुसरा हप्ता रोखून ठेवण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-०९-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

पंचायत समिती बाळापुर स्तरावर सिंचन विहिर लाभार्थींचे प्रशासकीय मंजुरीचे रजिस्टर ठेवण्यात आले असून त्यामध्ये एकूण २७९ सिंचन विहिर लाभार्थींचे प्रशाकीय मंजूरी दिल्याच्या नोंदी उपलब्ध आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय.

चौकशी करण्यात आली असून अकोला जिल्ह्यातील बाळापुर तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये भुजल सर्वेक्षण यंत्रणा, अकोला यांनी दिलेल्या लक्षांक पेक्षा जादा विहिरींना मंजुरी देण्यात आलेली आहे. जादा झालेल्या विहिरींची कामे पंचायत समिती स्तरावर स्थगीत केली असून वाढिव लक्षांक मिळण्याकरिता मा.वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, अकोला यांच्याकडे मागणी केलेली आहे.
(५) दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला कार्यालयाकडून कारणे दाखवा नोटीस देऊन स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीने गेल्या आर्थिक वर्षासाठीचे २९ कोटी १६ लाखाची मुदत संपली तरी निधी अखर्चित असल्याबाबत

**(४१) १११३६५ (०४-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीने गेल्या आर्थिक वर्षासाठीचे २९ कोटी १६ लाखाची मुदत माहे डिसेंबर, २०१७ मध्ये संपली तरी खर्ची पडेल नसल्याचे माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६-१७ चे दायित्व २९ कोटी १६ लाख आणि त्यामधील वितरित निधी २० कोटी इतका असून प्रत्यक्षात त्यामधील १६ कोटी ६०लाख इतकाच निधी खर्ची पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार निधी अखर्चित ठेवणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०९-२०१८) :** (१) व (२) जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध रु.१७०.९९ कोटी निधी पैकी वितरीत झालेला ७० % इतका निधी ३१ डिसेंबर २०१७ अखेर खर्च झाला होता,तथापि वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०१ फेब्रुवारी ,२०१८,अन्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्याला १००% निधी रु.१७०.९९ कोटी उपलब्ध होऊन ३१ मार्च २०१८ पर्यंत संपूर्ण निधी खर्च करण्यात आला आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री सडक योजनेंतर्गत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील घुणकी ते चावरे या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४२) १११४९५ (०५-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या प्रधानमंत्री सडक योजनेअंतर्गत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील घुणकी ते चावरे या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून याबाबतची तक्रार शाखा अभियंता यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) सदर रस्त्याची पाहणी व तपासणी राज्य गुणवत्ता निरिक्षक तसेच वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी केली असून सदर कामास समाधानकारक शेरा दिला आहे. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रुप ग्रामपंचायत मोज (ता.वाडा,जि.पालघर) येथील ग्रामपंचायतीने मौजे पिंपरोळी येथे तबेल्याचे अनधिकृत बांधकाम तसेच नाल्याचा प्रवाह बदलल्याबाबत**

**(४३) ११२०३५ (११-०४-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रुप ग्रामपंचायत मोज (ता.वाडा,जि.पालघर) येथील ग्रामपंचायतीने मौजे पिंपरोळी येथे तबेल्याचे अनधिकृत बांधकाम तसेच नाल्याचा प्रवाह बदलल्याने दिनांक ४ ऑक्टोबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, पालघर यांना निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी विना परवानगी शिवाय वैतरणा नदीवरुन पाणी उपसा करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायतीने अनेक वेळा नोटीसा देऊन देखील कोणत्याही प्रकारचे खुलासा केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार तबेल्याचे अनधिकृत बांधकाम व नाल्याचा प्रवाह बदलणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०९-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

कार्यकारी अभियंता, ठाणे पाटबंधारे विभाग कळवा-ठाणे यांच्या अहवालानुसार सन २०१६-१७ या वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात पाणीउचल करण्यासाठी महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या तरतुदीन्वये पाणी अर्ज नमुना -७ संबंधित शेतक-याकडून भरणा करुन घेण्यात आला आहे. सन २०१७-१८ साठी मागणी नसून पाणी उचल परवानगी देण्यात आली नाही.

(३) होय हे खरे आहे.

श्री. संजय मोहनलाल शर्मा यांनी तबेल्याचे बांधकाम करण्याकामी दि. २७.०३.२०१७ रोजी ग्रुप ग्रामपंचायत, मोज यांच्याकडे अर्ज केला. तथापि, सदर अर्जासोबत त्यांनी विहित कागदपत्रे तसेच N/A असल्याचा दस्ताऐवज जोडला नसल्याने यावर दि. ३०.०५.२०१७ रोजीच्या मासिक सभेत वाचन करुन तो निकाली काढण्यात आला. अनधिकृत बांधकामाबाबत दि. ३.०६.२०१७ रोजी ग्रामपंचायत कर्मचारी दोन-तीन वेळा नोटीस देण्याकरिता गेला असता त्यांनी ते पत्र स्विकारले नाही. सदर पत्र ग्रामपंचायतीने पोस्टाने पाठविले. तसेच ग्रामपंचायत, मोज यांनी श्री. संजय मोहनलाल शर्मा यांना दिनांक ६.०९.२०१७ व दि. २२.०९.२०१७ रोजी नोटीसा दिल्या आहेत. परंतु श्री. शर्मा यांनी सदर नोटीशीचा खुलासा सादर केलेला नाही.

यास्तव याबाबत ग्रुप ग्रामपंचायत मोज यांनी तहसिलदार, वाडा यांना दिनांक २९.०९.२०१७ रोजी व मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना दि. ४.१०.२०१७ रोजी निवेदनाद्वारे कळविले आहे.

(४) विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वाडा यांनी क्षेत्रीय पाहणी केली असता सदयस्थितीमध्ये श्री. शर्मा यांनी राहते घर, गवत व पेढा साठवणूकीचे गोदाम, कामगार निवास घर, रखवालदार केबिन बांधलेले आहे. आज अखेर ग्रामपंचायतीने सदर बांधकामावर कर आकारणी केली नसून दि. १८ जुलै, २०१७ च्या परिपत्रकानुसार ग्रामपंचायतीने कर आकारणी करण्याची तजवीज ठेवली आहे. नाल्याचा प्रवाह बदलल्याचे तसेच तिथे अनधिकृत पाण्याचा उपसा करत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही. सद्यस्थितीमध्ये नाला कोरडा आहे.

ग्रुप ग्रामपंचायत मोज सरपंच यांनी दि. ४/१०/२०१७ रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांना निवेदन दिले होते त्यावेळी श्री. शर्मा यांनी त्यांच्या तबेल्यातील शेण मलमूत्र नाल्यात सोडले होते. परंतू निवेदन दिल्यानंतर संबंधितांनी त्यांच्या जागेमध्ये शोषखड्डा घेऊन मलमूत्र निच-याची उपाययोजना केल्याचे दिसून येते. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये जनावरांचे मलमूत्र शेण व सांडपाणी सोडले जाते म्हणून नाला बाधित होत नाही. ग्रामपंचायतीने दि. ४/१०/२०१७ अन्वये जिल्हाधिकारी यांना कळविले असल्याने, ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारची पुढील कार्यवाही केलेली नाही.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ५२(१)(दोन) नुसार ज्या गावाच्या इतर क्षेत्रात (गावठाण क्षेत्राव्यतिरिक्त) जिल्हाधिकारी किंवा ज्यांचकडे जिल्हाधिकारी यांचे बांधकाम परवानगीचे अधिकार सोपविण्यात आले असतील अशा तहसिलदारांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या इतर कोणत्याही अधिका-यांची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. दि. ६/१/२०१८ पासून पालघर जिल्हयाकरिता प्रादेशिक योजना लागू झालेली असल्याने तसेच सदरचे अनधिकृत बांधकाम गावठाणाबाहेरील असल्याने या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांना कळविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागापूर (डोणगावं, जि.बुलढाणा) या गावाचा विकास गटविकास अधिकारी मेहकर, विस्तारी अधिकारी व ग्रामसेवक यांच्या नियोजनशून्य कारभाराबाबत**

**(४४) ११२७५३ (०७-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागापूर (डोणगावं, जि.बुलढाणा) या गावाचा विकास गेल्या दोन वर्षापासून गटविकास अधिकारी, मेहकर,विस्तारी अधिकारी व ग्रामसेवक यांच्या नियोजनशून्य कारभारामुळे प्रलंबित असून या प्रकरणी त्यांची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी सरपंच यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार संबंधित अधिकारी व ग्रामसेवकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०९-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदर प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मेहकर यांचेकडून चौकशी करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायतीच्या अंतर्गत वादामुळे विकास कामे करतांना ग्रामसेवकास अडथळा निर्माण झालेला होता. तथापि, प्रत्यक्ष चौकशीअंती दोन्ही बाजुच्या लोकांना समजावुन सांगण्यात येऊन सर्वमान्य तोडगा निघाल्यामुळे व विकास कामाचा अडथळा दूर झाल्यामुळे तक्रारकर्ते सरपंच यांचे समाधान होऊन तक्रार नसल्याबाबत दिनांक २२.११.२०१७ रोजी लेखी जबाब सादर केलेला आहे.

(३) दिनांक २२.११.२०१७ रोजी सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, नागपूर यांनी तक्रार नसल्याबाबत कळविल्यानुसार व प्रत्यक्ष चौकशी अंती दोन्ही बाजुच्या लोकांना समजावुन सांगण्यात येऊन सर्वमान्य तोडगा निघाल्यामुळे संबंधित अधिकारी व ग्रामसेवकावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रोजगार हमी योजनेतील मजुरांना वेळेत मजुरी न दिल्याने उस्मानाबाद जिल्ह्यातील आठही पंचायत समित्यांना दंड आकारल्याबाबत**

**(४५) ११३३३२ (११-०४-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेतील मजुरांना वेळेत मजुरी न दिल्याने उस्मानाबाद जिल्ह्यातील आठही पंचायत समित्यांना दंड आकारण्यात आला असून लाखो रुपयांच्या दंडाची वसूली सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेळेत मजुरांना पैसे न दिल्याने तहसील कार्यालयांनाही दंड आकारण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीयकृत बँकेत खाते असतानाही मजुरांना वेळेत मजुरी न दिल्याने आकारण्यात आलेल्या एकूण दंडापैकी किती रक्कम कोणकोणत्या गटविकास अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-०९-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उस्मानाबाद जिल्ह्यात मजुरांना वेळेत मजुरी न दिल्याने रु.१,४६,३३०/- एवढी रक्कम संबंधित पंचायत समिती व संबंधित अधिकारी यांच्याकडून वसुल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यात (जि.रायगड) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यांची कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(४६) ११४२४९ (०६-०४-२०१८). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यात (जि.रायगड) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०१७ मध्ये ५५ कोटीची रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली होती परंतु एकही गावांचे रस्ते पूर्ण करण्यात आले नाहीत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार रस्त्याची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये मंजुर २ रस्त्यांचे काम पुर्ण झाले आहे. उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर्थिक वर्षाच्या अखेरीस घाईघाईत येणा-या शासकीय खरेदीच्या प्रस्तावांना मंजूरी न देण्याबाबत वित्त विभागाने काढलेला आदेश**

**(४७) ११५११७ (०४-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक वर्षाच्या अखेरीस घाईघाईत येणाऱ्या शासकीय खरेदीच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात येऊ नये असे आदेश वित्त्त विभागाने माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशाने महिला व बालकल्याण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, शिक्षण, आरोग्य इत्यादी विभागांकडून राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०९-२०१८) :** (१) होय.

(२) अशा प्रकारची कोणतीही माहिती वित्त विभागास प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या अर्थसंकल्पातील निधी अखर्चित असल्याबाबत**

**(४८) ११६९६६ (२०-०७-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आर्थिक तरतूद विविध विभागांकडून संथगतीने खर्च करण्यात आली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अर्थसंकल्पातील २ लाख ६१ हजार ४९८ कोटी रुपयांच्या तरतूदीपैकी ६५ हजार ५०० कोटी रुपये शेवटच्या तीन महिन्यात तात्काळ खर्च करण्यात आल्याने विभागाचे विकासकामांकडे दुर्लक्ष झाले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) वित्तीय व्यवस्थापनासाठी प्रत्येक विभागात मासिक निधी विवरणपत्र तयार करुन त्यानुसार खर्च करावा लागतो. राज्याच्या अर्थव्यवस्थेवर पर्जन्यमानाचा मोठा परिणाम होत असून बहुतांश योजनेचा आर्थिक वर्षाचा खर्च हा मोठया प्रमाणावर पावसाळा संपल्यानंतर व दुसऱ्या सहामाहीमध्ये होतो. केंद्र पुरस्कृत योजनांवरील खर्च हा अपेक्षित केंद्रिय निधी प्राप्त झाल्यानंतर तसेच योजनेची प्राथमिक तयारी व अपेक्षित मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुरु होतो.

महालेखापाल कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीनुसार सन २०१७-१८ मध्ये राज्य शासनाव्दारे रु.२,६९,४१४ कोटी एवढा खर्च करण्यात आलेला असून शेवटच्या तीन महिन्यांमध्ये रु.१,०१,८६८ कोटी एवढा खर्च झालेला आहे. त्यामुळे विभागांव्दारे विकास कामांकडे दुर्लक्ष होतो असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

विभागांव्दारे मोठया प्रमाणावर वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात व सदर योजनांसाठी निधीची कमतरता भासणार नाही याबाबत शासन कटीबध्द आहे. तसेच जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याव्दारे हाती घेण्यात आलेले पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे प्रकल्प प्रगती पथावर असून त्यांना योग्य तो निधी दरवर्षी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

---

**सहायक अधिदान व लेखा अधिकारी यांच्याविरुध्द अधिदान व लेखा कार्यालय, फोर्ट येथील कर्मचा-यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीचा अहवाल**

**(४९) १२०४५७ (२०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहायक अधिदान व लेखा अधिकारी यांच्याविरुध्द अधिदान व लेखा कार्यालय, फोर्ट येथील कर्मचा-यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात काय आढळून आले,

(३) असल्यास, या अहवालानुसार सहायक अधिदान व लेखा अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध,मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत समितीने चौकशीमध्ये श्री.समीर भाटकर, सहायक अधिदान व लेखा अधिकारी यांचेविरुध्द लैंगिक गैरवर्तनाचे आरोप सिध्द होत असल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे तसेच त्या अनुषंगाने समितीने सबंधीत सहायक अधिदान व लेखा अधिकारी यांच्यावर ठपका ठेवण्याची शिक्षा बजावण्याबाबत शिफारस केली आहे.

(३) सबंधीत सहायक अधिदान व लेखा अधिकारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १० खाली ज्ञापन बजावण्यात आले आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य सरकारची कागदोपत्री लॉटरी बंद करून ऑनलाईन लॉटरी सुरू करण्याचा प्रस्ताव**

**(५०) १२१९८० (२०-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सरकारची कागदोपत्री लॉटरी बंद करून एप्रिल २०१८ पासून ऑनलाईन लॉटरी सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील इतर राज्यांनी कागदोपत्री लॉटरी बंद करून ऑनलाईन लॉटरी सुरू केल्यामुळे राज्याच्या महसुलाचे मोठे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर ऑनलाईन लॉटरी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५०९ (37)

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्याची पेपर लॉटरी चालू ठेवून महाराष्ट्र राज्याची ऑनलाईन लॉटरी सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र राज्य लॉटरी मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्याची ऑनलाईन लॉटरी सुरू करण्याबाबत तपशिलवार प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून घेण्यात येत आहे.

(४) प्रश्  उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.